CMYK

राज्याचा कौशल्य विभाग काळाची गरज ओळखून मार्गक्रमण करत आहे >>पान 2

कामगारांच्या कल्याणासाठी कटिबद्ध : मंत्री ॲड. आकाश फुंडकर >>पान 3

महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यात पाणी टंचाईचे चटके >>पान 4

**सुविचार**

प्रयत्न आणि धैर्य हे यशाचे मार्गदर्शक आहेत.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 247 ■ रविवार, दि. 20 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मिथुन चक्रवर्तीसोबत शूटिंग केल्याबद्दल या अभिनेत्रीला पश्चाताप, म्हणाली माझ्यावर बलात्कार..

आतील पान

# १९ वर्षांनी पुन्हा एकत्र येऊ शकतात राज-उद्धव

## राज ठाकरे म्हणाले- मतभेद छोटे, महाराष्ट्र मोठा, उद्धव म्हणाले- माझ्याकडून संघर्ष नाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महेश मांजरेकर यांच्या युट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये पुन्हा एकदा टाळी देण्याचे संकेत दिल्यानंतर आज (१९ एप्रिल) शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा थेट जाहीरपणे टाळी देत एक प्रकारे मनसे युतीचे संकेत दिले आहेत. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात उद्धव आणि राज्य ठाकरे यांनी महाराष्ट्र धर्मासाठी एकत्र यावं यासाठी मराठी माणसाकडून स्वप्न पाहिलं जात आहे ते पुन्हा एकदा वास्तवात येणार का? याची उत्सुकता आहे. उद्धव ठाकरे यांनी जाहीर कार्यक्रमामध्ये बोलताना माझ्याकडून जी भांडणं असतील (ती नव्हतीच असेही त्यांनी नमूद केले) मिटवली चला असे म्हणत एक प्रकारे राज ठाकरे यांनी दिलेल्या टाळीला प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे या भांडणाचा संदर्भ ते तुम्हाला चर्चा सुरु आहे त्यावरून लक्षात येईल म्हणत राज यांच्या भूमिकेवर जाहीर भाष्य केलं.**



उद्धव ठाकरे म्हणाले की, किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे. मी सर्व मराठी माणसांना महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याचं आवाहन आहे, पण एक अट आहे, जेव्हा आम्ही लोकसभेला सांगत होतो, हे सगळे उद्योग घेऊन गुजरातला जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर महाराष्ट्र हिताचं सरकार केंद्रात आणि राज्यात बसवू शकलो असतो. तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा मग परत तडजोड करायची हे असं नाही चालणार. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला घरी मी बोलवणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही, त्याचं आगत स्वागत करणार नाही, हे पहिलं ठरवा, मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली भांडणं मी आज सांगतो, जी भांडणं माझ्याकडून नव्हतीच, ती मी मिटवून टाकली चला, पण पहिलं हे ठरवा.

उद्धव ठाकरे यांनी हिंदीवरूनही महायुती सरकारला जाहीर इशारा दिला. ते म्हणाले की, हिंदी सक्ती कराल तर उखडून फेकू. हिंदीची सक्ती पहिलीपासून याचा काय करायचं? अशी विचारणा त्यांनी केली. त्यांनी सांगितले की, आम्ही प्रेमाने सर्व ऐकू, पण सक्ती कराल तर तुमच्या सकट उखडून फेकून देऊ. अनेक ठिकाणी मराठी शिकण्यासाठी उत्साह वाढत आहे. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये मराठी सक्ती करण्याचा निर्णय हा माझ्या मंत्रिमंडळाने घेतला.

>> पान २

### ही रक्ताची नाती, मुंबई आणि मराठी माणसासाठी एकत्र यावेच लागेल; संजय राऊतांची राज ठाकरेंना साद

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज ठाकरेंची भूमिका नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही, मुंबई आणि मराठी माणसांसाठी एकत्र यावचं लागेल असं शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी वक्तव्य केलं. राज ठाकरेंनी आता कुठे मन मोकळं केलं, त्याला आम्ही प्रतिसाद दिला. आता आम्ही वाट बघतोय असंही सूचकपणे संजय राऊत म्हणाले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघेही भाऊ आहेत, ही रक्ताची नाती आहेत असं सांगत संजय राऊतांनी एक प्रकारे राज ठाकरेंना युतीसाठी साद घातल्याचं दिसतंय.

आपल्यातील भांडणे छोटी असून एकत्र येणं कठीण नाही असं राज ठाकरेंनी एका मुलाखतीत म्हटलं. त्यावर उद्धव ठाकरे यांनीही >> पान २

### सोलापूरच्या प्रसिद्ध न्युरोसर्जनची आत्महत्या

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध न्युरोसर्जनने आत्महत्या केली. न्युरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी डोक्यात गोळी झाडून घेतली आणि आत्महत्या केली.



डॉ. शिरीष वळसंगकर यांनी त्यांच्या निवासस्थानी रात्री साडे आठच्या सुमारास स्वत:च्या डोक्यात गोळी मारून घेतली. गोळीबाराचा आवाज ऐकताच कुटुंबियांनी डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या खोलीच्या दिशेने धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या डॉ. शिरीष वळसंगकर यांना कुटुंबियांनी तातडीने वळसंगकर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. न्युरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्याच वळसंगकर हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांवर उपचार सुरू झाले. सुरुवातीला प्रकृती गंभीर असल्याचे हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी वळसंगकर यांच्या कुटुंबियांना सांगितले. थोड्या वेळाने मृत्यूची माहिती कुटुंबियांना देण्यात आली.

शुक्रवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास डॉ. शिरीष वळसंगकर यांचे निधन झाल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच सोलापूर शहर पोलीस दलातील वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. आत्महत्येमागचे नेमके कारण काय आहे याचा पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान या घटनेने सोलापुरात खळबळ उडाली आहे.

### आमदार धनंजय मुंडेंना झाला 'हा' आजार



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी हा आजार झाला आहे. या आजारात चेहऱ्याला पक्षाघाताचा झटका येतो. यामुळे चेहऱ्याचे स्नायू कमकुवत होतात. बोलायला त्रास होतो किंवा बोलता येत नाही. अनेकदा हा आजार मर्यादीत कालावधीपुरता त्रासदायक असतो. वेळेत उपचार केले तर या आजारातून बरे होणे शक्य आहे. अनेकदा औषधोपचाराने दोन आठवडे ते सहा महिन्यांच्या कालावधीत रुग्ण बरा होतो.

धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमधून त्यांनी बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झाल्याचे सांगितले. उपचार सुरू आहेत पण अद्याप पूर्ण बरा झालेलो नाही, असेही धनंजय मुंडे यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे.

आमदार धनंजय मुंडे यांचा विश्वासू म्हणून ओळखला जाणारा वाल्मिक कराड सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अडचणीत आहे. करुणा मुंडे यांच्या वक्तव्यांमुळे धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला धक्का बसल्याची चर्चा आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आमदार धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी हा आजार झाल्याचे वृत्त आले आहे.

मागील काही दिवसांपासून धनंजय मुंडे कॅमेऱ्यापुढे आलेले नाहीत. त्यांच्या आजाराविषयी उलटसुलट चर्चेला उधाण आले. यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर एक पोस्ट केली. या पोस्टद्वारे धनंजय मुंडे यांनी त्यांना झालेल्या आजाराची माहिती दिली.

## जेईई मेन्सचा निकाल जाहीर, महाराष्ट्रातून आयुष रवी चौधरी पहिला; देशातून राजस्थानचा एम.डी. अनस पहिला

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** जेईई मेन्स सत्र २ चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. 'एनटीए'कडून शुक्रवारी रात्री उशिरा हा निकाल जाहीर करण्यात आला. त्यासोबतच या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांची यादीही जाहीर करण्यात आली आहे. ज्या परीक्षार्थींनी ही परीक्षा दिली होती ते जेईई मेनच्या अधिकृत संकेतस्थळावर क्षशशारळप.पींर.पळल.ळप जाऊन त्यांचा निकाल पाहू शकतात. निकाल तपासण्यासाठी, उमेदवारांना त्यांचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड वापरावा लागेल.

या परीक्षेत एम.डी. अनस (राजस्थान) देशात पहिला आला. तर महाराष्ट्रातून आयुष रवी चौधरी पहिला आला आहे.





यासोबत आयुष सिंघल (राजस्थान), आर्किस्मान नंदी (पश्चिम बंगाल), देवदत्त माझी (पश्चिम बंगाल), लक्ष्य शर्मा (राजस्थान), कुशाग्र गुप्ता (कर्नाटक) यांनी या परीक्षेत बाजी मारली आहे.एनटीएने फक्त जेईई मेन्स पेपर १ (बीईबीटेक) चा निकाल जाहीर केला आहे. पेपर २ (बी.आर्कबी.प्लॅनिंग) चा निकाल अद्याप प्रलंबित आहे.

निकाल जाहीर करण्यापूर्वी, एनटीएने १८ एप्रिल रोजी अंतिम उत्तरपत्रिका जारी केली होती, ज्यासाठी एनटीएने आधीच त्यांच्या अधिकृत ट्विटर हँडलवर जाहीर केले होते की जेईई मुख्य सत्र २ ची अंतिम उत्तरपत्रिका १८ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता प्रसिद्ध केली जाईल आणि निकाल १९ एप्रिल रोजी जाहीर केला जाईल.

एनटीएने अंतिम उत्तरपत्रिकेतून दोन प्रश्न काढून टाकले आहेत आणि एनटीएच्या नियमांनुसार, सर्व उमेदवारांना काढून टाकलेल्या प्रश्नांसाठी पूर्ण गुण मिळतील. गुरुवारी, १७ एप्रिल रोजी, एनटीएने जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन (जेईई) मुख्य सत्र २ ची अंतिम उत्तरपत्रिका राास्रग. हूर.हग्म.ग्ह या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केली, परंतु काही तासांनंतर ती काढून टाकली.

जेईई मेन्स सत्र २ चा निकाल कसा पाहायचा?

१. पहिल्यांदा अधिकृत वेबसाईट jeemain.nta.nic.in वर जा.

२. नंतर सत्र २ च्या स्कोअरकार्डची लिंक उघडा.

३. त्यानंतर तुमचे लॉगिन तपशील भरा आणि ते सबमिट करा.

४. आता तुमचे स्कोअरकार्ड तपासा आणि ते डाउनलोड करा.

## ठाकरे बंधूंनंतर पवार घराण्यातही 'युती'चे वारे?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या शक्यतेनंतर आता पवार कुटुंबातही जुळवणूक होण्याच्या हालचाली सुरू झाल्याचं चित्र आहे. विशेष म्हणजे याचे संकेत स्वतः पवार घराण्यातीलच एक बडे नेते रोहित पवार यांनी दिले आहेत.



राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी एक्स या सोशल मीडियावरून आपले विचार मांडताना सर्व कुटुंबांनी एकत्र यायला हवं, अशी भावना व्यक्त केली आहे. त्यांनी या पोस्टमध्ये थेट अजित पवार यांना टॅग केलं नाही. मात्र, या ट्वीटने आता वेगळ्याच चर्चा सुरू झाल्या आहेत. ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीनंतरच ही प्रतिक्रिया येत असल्यामुळे याला राजकीय वजन प्राप्त झालं आहे.

त्यांनी लिहिलं की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यातील चर्चा आणि त्यातून उमटणारी सकारात्मकता पाहून असं वाटतं की, आता प्रत्येक कुटुंबानं अशा मोठ्या

### शरद पवारांच्या अत्यंत जवळच्या व्यक्तीने दिले संकेत

हेतूने एकत्र यायला हवं. भांडणं आणि मतभेद क्षणिक असतात, पण महाराष्ट्राचं भवितव्य मोठं आहे.

शरद पवार-अजित पवार एकत्र येणार?

रोहित पवार हे शरद पवार गटाचे प्रमुख युवा नेतृत्व मानले जातात. गेल्या वर्षभरात अजित पवार गट आणि शरद पवार गटात झालेल्या फूटीनंतर दोन्ही गटांमध्ये राजकीय अंतर वाढलं आहे. मात्र, सध्या सुरू असलेल्या बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्र्वभूमीवर रोहित पवारांची ही पोस्ट मोठा संदेश देणारी ठरू शकते.

राजकीय विश्लेषकांच्या मते, जसे ठाकरे कुटुंबात भूतकाळ विसरून पुढे जाण्याचे संकेत दिसत आहेत, तसाच विचार पवार कुटुंबातही सुरू झाल्यास महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी भूकंपसदृश घटना घडू शकते.

# बनावट पनीर विक्रेत्यांवर आता एफडीएची नजर

## ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे परवाने रद्द होणार-अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉग वापरणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येत आहे. पनीरसारख्या बनावट पदार्थाची विक्री केल्याचे आढळून आल्यास अशा व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे.

मंत्री श्री. झिरवाळ यांनी सांगितले, पनीर हा खाद्यपदार्थामधील आवडता पदार्थ असून त्याला बाजारात मोठी मागणी असते. विशेषत: लहान मुलांमध्ये पनीरची क्रेझ अधिक आहे. मात्र काही ठिकाणी बनावट पनीर अथवा 'चीज ॲनालॉग' वापरून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत आढळून येते. अशा प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या पनीर विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, तसेच २०११ आणि २०२२ मधील नियमानुसार ही कारवाई केली जाईल.

अन्न सुरक्षा आणि मानके (लेबलिंग व डिस्प्ले नियमन) २०२० च्या नियमांनुसार, विक्री होणाऱ्या अन्नपदार्थातील सर्व घटक व पोषणमूल्यांची माहिती ग्राहकांसमोर मांडणे बंधनकारक आहे. रेस्टॉरंट, हॉटेल, कॅटरर्स आणि फास्ट फूड विक्रेत्यांना आपल्या मेनू कार्ड्स, डिस्प्ले बोर्ड्स आणि ऑर्डर मशीनवर अचूक माहिती देणे अनिवार्य आहे.

अन्न व औषध प्रशासन विभाग ग्राहकांच्या हितासाठी कटिबद्ध आहे. अन्नाच्या गुणवत्तेशी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही.

रेस्टॉरंट, हॉटेल व फास्ट फूड व्यावसायिकांकडून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम १८ (२)() नुसार, ग्राहकांना अन्नपदार्थातील घटकांची माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच, अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग आणि डिस्प्ले) नियमन २०२० च्या प्रकरण ३ मधील नियमन ९ (६) नुसार, अन्न व्यावसायिकांनी अन्नपदार्थांची विक्री करताना पोषण संबंधित माहिती आणि त्यातील घटकांची माहिती, तसेच आरोग्य संदेश प्रदर्शित करणे आवश्यक आहे.



अन्न व औषध प्रशासन सर्व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील चीज ॲनालॉग वितरकांचे खरेदी-विक्री बिले तपासण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, हॉटेल, रेस्टॉरंट, फास्ट फूड विक्रेते आणि केटरर्स यांची खरेदी बिले तपासून, पनीरच्या ऐवजी ॲनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक केल्यास, किमान १० आस्थापनांची सखोल तपासणी करून अन्न नमुने घेऊन धाडी-जप्तीची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व नियमन २०११ तसेच अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यवसायिक परवाना व नोंदणी) नियमन २०११ मधील तरतुदींनुसार तात्काळ परवाना निलंबनाची कार्यवाही केली जाईल.

विभागीय सह आयुक्त (अन्न) आणि सहा आयुक्त >> पान २

CMYK

# राज्याचा कौशल्य विभाग काळाची गरज ओळखून मार्गक्रमण करत आहे

## राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

## रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा दुसऱ्या वर्धापन दिनाचा समारोप

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** काळाची गरज ओळखून रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून जगभरात भारतीय कुशल मनुष्यबळ पुरवत आहे, ही आनंदाची बाब आहे असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या दुसऱ्या वर्धापन दिनाच्या समारोप कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन विद्यार्थ्यांना संबोधित करत होते.

एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल येथे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा दुसऱ्या वर्धापन दिनाचा समारोप कार्यक्रम पार पडला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन होते. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या वर्धापन दीन समारोपात कौशल्य रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सिताराम, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख, कौशल्य विभाग आयुक्त नितीन पाटील उपस्थित होते.




राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन पुढे म्हणाले की, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वाणिज्य आणि मीडिया या क्षेत्रात कौशल्य शिक्षण आणि प्रशिक्षणाचा प्रारंभ केला आहे, हे अतिशय आनंददायक आणि उल्लेखनीय आहे. बदलत्या काळात आपल्या पारंपरिक कौशल्याच्या पलीकडे जाऊन आपण नवी पिढी घडवली पाहिजे, त्यासाठी आपल्या शिक्षकांनीही नवी संकल्पना समजून घेऊन त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यायला हवे. रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विभागाच्या कुलगुरू श्रीमती अपूर्वा पालकर या दृष्टिकोनातून योगदान देत असल्याबाबत त्यांचेही अभिनंदन करतो असेही, राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी नमूद केले.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. विकसित राष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी सुरू केलेला स्किल इंडिया हा उपक्रम या संकल्पात महत्वाचा भाग आहे. जागतिक कौशल्य आत्मसात करताना परदेशी भाषा शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. राज्याच्या कौशल्य विभागाने जर्मन भाषा विद्यार्थ्यांना शिकवून मनुष्यबळ पुरवण्याचा अतिशय योग्य निर्णय घेतला असल्याचेही राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी एखादी तरी जागतिक भाषा शिकावी, असे आवाहनही यावेळी राज्यपालांनी केले. जगात आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरवण्यासाठी आपल्या महाराष्ट्रात मोठा वाव असल्याचेही ते म्हणाले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कौशल्य, भारतीय मूल्ये आणि एकात्मिक शैक्षणिक प्रणालीवर भर देत आहे. मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये कौशल्याधारित शिक्षणाचा समावेश केल्याने जागतिक स्तरावर रोजगाराभिमुख संधी उपलब्ध होऊ शकते. यासंदर्भात रतन महाराष्ट्र विद्यापीठाने आधीच आर्टिफिशियल इंटेलिजन्स , रिअल इस्टेट, सेवा क्षेत्र, आणि औद्योगिक व्यवस्थापनात हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला आहे, ही अतिशय जमेची बाजू असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की,राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे आमचे ऊर्जास्त्रोत असल्याचे सांगितले. त्यांच्या सहकार्याने विद्यापीठ नव्या उंचीवर जाणार असल्याचेही लोढाजी म्हणाले.

रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती अपूर्वा पालकर यांनी यावेळी विद्यापीठात सुरू असलेल्या कोर्से सची तसेच मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर केंद्रात सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या विद्यापीठात शिक्षित झालेला स्नातक जगाच्या कानाकोपऱ्यात आपले भवितव्य घडवायची क्षमता ठेवतो. राज्यशासनाच्या वतीने लवकरच अद्ययावत सुविधांसह पनवेल इथे विद्यापीठाची भव्य वास्तू उभारण्यात येणार असल्याची माहितीही कुलगुरू डॉ. पालकर यांनी यावेळी दिली.

राज्यातल्या युवकांना जर्मनीत काम करण्याची संधी कौशल्य विभागाने मिळवून दिली असून विविध स्तरावर यावर उपक्रम राबवण्यात येत असल्याचे कौशल्य विभागाच्या अप्पर मुख्य सचिव, आयुक्त श्रीमती मनीषा वर्मा यांनी स्पष्ट केले. रतन टाटा महाराष्ट्र विद्यापीठात थिअरी बरोबरच प्रशिक्षणावर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे अनेक उद्योगक्षेत्राकडून या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मोठी मागणी निर्माण होणार आहे. परदेशी कंपन्यांसोबत कराराच्या प्रक्रिया पूर्णत्वाला जात असून हे विद्यापीठ जगात एक ब्रँड म्हणून नावाजले जाईल, असा विश्वास वर्मा यांनी यावेळी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या सांगता समारंभात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला. आदर्श प्राध्यापक संदीप जैन, आदर्श युवा प्राध्यापक अनिरुद्ध चव्हाण, प्रशासकीय उल्लेखनीय कार्य मीना श्रीमाळी, ग्रंथपाल मीनाक्षी पाटील तर संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनीचे पारितोषिक दीप्ती जाधव यांना देण्यात आले. उत्कृष्ट स्टार्ट अप गटात एक लाख रुपयांचे पारितोषिक वैष्णवी कोठावडे यांना दुसरे दोन लाखांचे पारितोषिक साक्षी पारेख यांना तर तीन लाखांचे पाहिले पारितोषिक विष्णुदास विश्वकर्मा यांना राज्यपालांचे हस्ते देण्यात आले.

## सांस्कृतिक कार्यक्रमातून विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांना मानवंदना; गेट व ऑफ इंडिया, मुंबई येथे २० एप्रिलला कार्यक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे रविवार, २० एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधासभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, लोकसभा सदस्य अरविंद सावंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमात सुरेश वाडकर, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, आदर्श शिंदे, मिलिंद शिंदे, नंदेश उमक, अवधूत गुप्ते व शाहीर राजा कांबळे हे कलाकार सहभागी होणार असून, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुबोध भावे करणार आहेत. या कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीते, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सन्मानिका प्रवेशपत्रे शिवाजी नाट्य मंदिर व रवींद्र नाट्य मंदिर येथे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केली जातील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे.

## मिथुन चक्रवर्तीसोबत शूटिंग केल्याबद्दल या अभिनेत्रीला पश्चाताप, म्हणाली माझ्यावर बलात्कार..

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मनोरंजन सृष्टीत साहसी किंवा कठीण दृश्यांची गरज भासत असते, जिथे अनेकदा बॉडी डबल्सचा वापर होतो. पण कधी कधी ही दृश्ये कलाकाराच्या परवानगीशिवाय शूट केली जातात, आणि त्यामुळे कलाकारांना नंतर पश्र्चाताप करावा लागतो. असाच अनुभव अभिनेत्री आयेशा झुल्का यांनी 'दलाल' चित्रपटाच्या संदर्भात शेअर केला आहे.१९९०च्या दशकात आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असलेल्या आयेशा झुल्काने आपल्या करिअरची सुरुवात सलमान खानसोबतच्या 'कुर्बान' या चित्रपटातून केली. 'जो जीता वही सिकंदर' (१९९२), 'खिलाडी' (१९९२), 'मेहरबान' (१९९३) यांसारख्या चित्रपटांतून तिने प्रेक्षकांची मनं जिंकली.

तिने प्रकाश मेहरा निर्मित आणि पार्थो घोष दिग्दर्शित 'दलाल' या चित्रपटात मिथुन चक्रवर्ती यांच्यासोबत काम केलं. सुरुवातीला शूटिंग सुरळीत सुरू असताना नंतर आयेशाला कळलं की तिच्या परवानगीशिवाय एका बलात्कार प्रसंगात बॉडी डबल वापरून दृश्य शूट करण्यात आलं.

या घटनेबाबत सांगताना आयेशा म्हणाली, माझ्या नकळ माझ्यावर बलात्कार होत असलेला प्रसंगाचा सीन शूट केला गेला. मी त्या सीनबाबत पूर्ण अंधारात होते. इतकंच नाही, तर ट्रायल शोसाठी देखील मला बोलावण्यात आलं नव्हतं. या सीनबाबतची माहिती एका पत्रकाराकडून मिळाल्याचं आयेशा म्हणाली. त्या पत्रकाराने मला विचारलं, 'तुला या सीनबाबत माहिती आहे का? आम्हाला खूप आश्र्चर्य वाटतंय की तू हे कसं मान्य केलं?' कारण सर्वांनाच माहिती होतं की तो बॉडी डबल होता, असं ती म्हणाली. या वादग्रस्त दृश्यावर प्रतिक्रिया मिळवण्यासाठी आयेशा झुल्काने प्रकाश मेहरांना फोन केला. मात्र, त्यांच्या उत्तरांनी ती आणखी संभ्रमात पडली. प्रकाश मेहराजींनी मला सांगितलं की अशा प्रकारचं काहीच दृश्य चित्रपटात नाही. मी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला, कारण मी पाहिलेल्या ट्रायलमध्ये तो सीन नव्हता, असं तिने सांगितलं.

## महाराष्ट्राचा बहुमान

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून १४ मे पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत, आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल. भारताचे सर न्यायाधीश म्हणून शपथ घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलीत न्यायमूर्ती आहेत याआधी के जी बालकृष्णन पहिले दलीत सर न्यायाधीश बनले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सर न्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा बहुमान होय कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रीपाई नेते व माजी राज्यपाल रा सू गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाचा निर्णय ठरला. जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटना पिठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही, सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सर न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!

## ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर अतिशय आनंदाची बातमी खासदार सुप्रिया सुळे यांची प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे व राज ठाकरे हे दोघे बंधू एकत्र आल्यास अतिशय आनंदाची बातमी आहे अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली यावेळी त्या म्हणाले की, राज ठाकरे म्हणाले की, आमच्या वादापेक्षा महाराष्ट्रातले वाद मोठे आहेत. मी दोघांनाही संपर्क साधला आहे.ही गोष्ट खूप आनंदाची आहे. आमची आणि बाळासाहेब ठाकरे यांचे पाच सहा दशकाचे कौटुंबिक संबंध आहेत. राज ठाकरे व उद्धव ठाकरे आमच्या कुटुंबासाठी आजही प्रिय आहेत. बाळासाहेब आज हा दिवस बघण्यासाठी असते, तर आज आम्हाला खूप आनंद झाला असता. महाराष्ट्राच्या हितासाठी आणि कुटुंबासाठी दोघे एकत्र येत असतील, तर राजकीय आणि कौटुंबिक, इतिहासातला सोनेरी दिवस आहेत. दोन बंधू महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येत असतील, तर आपण मनाने त्यांचं स्वागत केलं पाहिजे. दोनही पवार एकत्र यावे का या प्रश्नावर बोलताना त्या म्हणाल्या तू पांडुरंगाची इच्छा आहे.नातेसंबंध माझ्यासाठी आजही आणि उद्याही खूप महत्त्वाचे आहेत. अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.



पान १ वरून...

## १९ वर्षांनी पुन्हा एकत्र

जो महाराष्ट्रात राहणार त्याला मराठी ही आलीच पाहिजे. इथं राहता, आमचं मीठ खाता आणि मराठी भाषेला तुम्ही विरोध करता अशी टीका त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे आणि मराठी माणसाचे मारेकऱ्यांची सुपारी घेऊन हे सत्ताधारी बसले आहेत का?जर महाराष्ट्रात राहायचं असेल तर जय महाराष्ट्र बोलावत लागेल यांना हिंदीची सक्ती करायची असेलच तर फडणवीस यांना सांगतो. तुमचे जे जोशी आले होते ना माशी जिंकली तसे बोलून गेले, त्याच घाटकोपरमध्ये आधी मराठी सक्ती करून दाखवा. घाटकोपरमध्ये मराठी सक्ती करून दाखवा. प्रत्येकाला मराठी बोलता येत का ते दाखवा, असे आव्हान दिले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, मुंबईत सुद्धा काही गोष्टी अदानीच्या घशात घातल्या. आणि तुम्ही त्यावर बोलू नये म्हणून तुम्हाला भांडणात व्यस्त ठेवायचं असा प्रकार आहे. आता काय दुर्दैवाने सरकार आलं आहे ते जाहीरनाम्यावर काहीच कोणीच बोलत नाही. तुम्ही मारलेल्या थापा ऐकून मतदान केलं असं आपण एक वेळ म्हणू,पण त्यावर आता कोणीच बोलत नाही. अजित पवार म्हणतात की माझ्या भाषणात कर्जमाफी कधी बोललो ते तुम्ही मला दाखवा? हे कोणतं राजकारण आहे, अशी विचारणा त्यांनी केली.

मराठी माणसाच्या हक्कासाठी शिवसेना

उद्धव ठाकरे म्हणाले की, मराठी माणसाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शिवसेनेचा जन्म झाला आहे. प्रत्येक कामगाराचा शाखेसोबत समन्वय झालाच पाहिजे. खूप जणांना काही देता नाही आला तरीसुद्धा ते हिंदुत्वासाठी आणि पक्षासाठी माझ्यासोबत राहिले. कामगार कायद्यांना आपण विरोध केला पाहिजे, पण निवडणुकीवेळी आपण विस्कळीत असतो. कारण आपल्या डोक्यावर काहीतरी टाकलेलं असते. आता वक्फ बोर्ड आणला गेला, त्यामध्ये सुद्धा आपण जो प्रश्र्न विचारला तोच सुप्रीम कोर्टाने त्यांना विचारला. वक्फ बोर्डावर जर तुम्ही कायद्यानं गैर मुस्लिम माणूस ठेवताय तर आमच्या हिंदूमध्ये सुद्धा तुम्ही उद्या काही करू शकता, असा इशारा त्यांनी दिला. त्यांनी पुढे सांगितले की, आम्ही महाराष्ट्राचे मराठी कडवट आहोत. शेतकऱ्यांचे काळे कायदे आले तेव्हा शेतकरी रस्त्यावर उतरला तसा कामगार रस्त्यावर उतरला नाही त्यांचा मिशन हेच आहे की कोणी एकत्र आलं नाही पाहिजे. आपल्याला भांडणात गुंतवून ठेवून यांचे काय चाळे चालले आहेत ते पहा.

## ही रक्ताची नाती, मुंबई आणि मराठी

त्याला प्रतिसाद देत महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र यायला तयार आहोत असं म्हटलं. त्यानंतर आता संजय राऊत यांनीही युतीसाठी मनसेच्या राज ठाकरेंना साद घातल्याचं दिसून येतंय.

उद्धव ठाकरेंसोबत मी यावर चर्चा केली आहे, आम्ही हवेत बोलत नाही. मराठी माणसावर कोणी घाव घालत असेल तर आम्ही साद देण्याची वाट पाहू. याहून चांगलं काही होण्याची आम्ही वाट पाहू असं संजय राऊत म्हणाले.

अमित शाह यांनी शिवसेना तोडली, तिचे दोन तुकडे केलेत आणि तेच अमित शाह आता दुसरा पक्ष चालवत आहेत. हे विंचू आहेत, उद्या तुम्हाला देखील डंख मारतील असा इशारा संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना दिला.

महाराष्ट्राच्या हितासाठी वाद मिटवायला तयार

संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघेही भाऊ आहेत. काही राजकीय मतभेद झाले असतील. इथेही ठाकरे, तिथेही ठाकरे आहेत. दोघे भाऊ, नाते कायम आहे. मार्ग वेगळे झाले असले तरी उद्धव ठाकरेंचा मार्ग महाराष्ट्र हिताचा राहिला आहे. राज ठाकरेंचं वक्तव्य मी आणि उद्धवजींनी ऐकलं. महाराष्ट्र हितासाठी मी वाद मिटवायला तयार आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. लोकसभा निवडणुकीवेळी उद्धव ठाकरे हेच सांगत होते. महाराष्ट्रच्या मुळावर येणाऱ्या या फौजा आहेत. आम्ही वेट एन्ड वॉचच्या भुमिकेत आहोत. आम्ही सकारात्मक भूमिकेतून याकडे बघतोय.

संजय राऊत पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील शूत्रंना मदत होईल अशी भूमिका घेऊ नये असं आम्ही सांगितलं होतं. हे योग्य नाही, महाराष्ट्राला परवडणारे नाही ही भूमिका आजही आमची आहे. माणसाचे नुकसान व्हावे, महाराष्ट्राला पाण्यात पाहात आहेत अशांना आम्ही घरात घेणार नाही. महाराष्ट्राचे शत्रू आमचे शत्रू अशी भूमिका कोणी घेत असेल तर आमचे स्वागत आहे.

## बनावट पनीर विक्रेत्यांवर

(अन्न) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील हॉटेल असोसिएशनच्या कार्यशाळा घेऊन, पनीरच्या ऐवजी चीज ॲनालॉगचा वापर करत असल्यास, त्याबाबत मेनू कार्डमध्ये उल्लेख करण्याबाबत तसेच कायद्यातील तरतुदींबाबत अवगत करावे. यासोबतच, ग्राहकांमध्ये याबाबत जनजागृती करावी.

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला माफ केले जाणार नसून अन्न व्यावसायिकांनी नियमांचे पालन करून ग्राहकांना अचूक माहिती देणे आवश्यक आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...


### ठाकरे बंधू एकत्र आले तर निश्चितच महाराष्ट्राचा फायदा होईल : वैभव नाईक



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे बंधू एकत्र आले तर निश्चितच महाराष्ट्राचा फायदा होईल.असे मत माजी आमदार वैभव नाईक यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितलं आहे की, आमचे काही भांडणं नाहीत.महाराष्ट्रावर इतर लोकांचा जो आघात होत आहे तो थांबवायला पाहिजे. मराठी माणूस मुंबई टिकवायची असेल आणि मराठी भाषा टिकवायची असेल तर मी कोणाबरोबरही एकत्र यायला तयार आहे, सांगितले आहे. त्याचा फक्त गैरवापर होता कामा नये. अनेक वेळा निवडणुका आल्या की, सत्ताधारी पक्षातले लोक राज ठाकरेंना भेटतात आणि त्यांचा वापर करून घेतात आणि त्यांना बाजूला केलं जातं. त्यामुळे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले पाहिजे की, आपल्याला कोणाविरुद्ध लढायचे आणि कुणासाठी लढायचे आहे हे स्पष्ट केले पाहिजे. असे मत यावेळी माजी आमदार वैभव नाईक यांनी व्यक्त केले.

### गारगाई धरण प्रकल्पाला मान्यता दिल्याने कांदिवलीत भाजपकडून "धन्यवाद देवा भाऊ" स्वाक्षरी मोहीम



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या गारगाई धरण महाविकास आघाडीने पर्यावरणाच्या नावाखाली रद्द केले होते. विधिमंडळ अधिवेशनादरम्यान मी वेळोवेळी यासंदर्भात मुद्दे उपस्थित केले आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गारगाई धरण प्रकल्पास हिरवा कंदील दिला. देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीच जनहिताचे निर्णय घेतले आहेत. आता महाराष्ट्राचा विकास आणि महाराष्ट्र थांबणार नाही. गारगाई धरणाच्या महत्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धन्यवाद दिले. म्हणून प्रकल्पाला दिलेल्या मान्यतेबद्दल आज आम्ही धन्यवाद देवा भाऊ ही स्वाक्षरी मोहीम सुरु केली आहे, असे यावेळी भाजप आमदार अतुल भातखळकर म्हणाले.

### सिडकोविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबई सोडकोच्या कार्यालयाबाहेर पनवेलमधील आदिवासी बांधवांनी गेल्या अकरा दिवसांपासून आंदोलन पुकारले आहे. आपले घरे वाचवण्यासाठी आदिवासी बांधव सिडकोबाहेर आमरण उपोषण करत आहेत. मात्र, अद्यापही सिडको प्रशासनाला जाग येत नसल्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक झाल असून, सिडको कार्यालयाविरोधात ढोल वाजवत आंदोलन केले. यावेळी नवी मुंबईतील राष्ट्रवादी शरद पवार गटाने या आदिवासी बांधवांना पाठिंबा दिला असून, सिडकोला पत्र देखील देण्यात आले. यावेळी सिडकोविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली असून, सिडकोच्या भोंगळ कारभाराचा निषेध देखील करण्यात आला.

### नागरिक गाढ झोपेत असतानाच पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली इमारत!

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील मुस्तफाबाद परिसरात मोठी दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. मध्यरात्रीच्या सुमारास एक चार मजली इमारत कोसळून चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. तसेच दहाहून अधिकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ टीम आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून बचावकार्य सुरु करण्यात आले. मात्र नागरिक गाढ झोपेत असतानाच पत्त्याच्या बंगल्यासारखी इमारत कोसळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# कामगारांच्या कल्याणासाठी कटिबद्ध : मंत्री ॲड. आकाश फुंडकर

## मंगरूळपीर येथील सांस्कृतिक भवनात कामगारांना गृहोपयोगी वस्तू संचाचे वाटप

दैनिक आपला विदर्भ





वाशीम : "कामगार हा आपल्या समाजाचा खरा कणा आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीच्या पायाभूत रचनेमध्ये कामगारांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांची आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक सुरक्षा ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. त्यांच्या गरजा ओळखून त्यांना सहाय्य करणाऱ्या विविध योजना राज्य सरकारकडून राबवण्यात येत आहेत. आज गृहोपयोगी वस्तूंचा संच वाटप केवळ वस्तू देण्यापुरता मर्यादित नाही, तर या माध्यमातून त्यांच्या जीवनात थोडासा दिलासा मिळावा, ही भावना यामागे आहे.

शासन शेतकरी, कामगार, गरीब व सामान्य नागरिक केंद्रस्थानी ठेवून कार्य करत आहे. कामगार कल्याण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले.

२० एप्रिल रोजी मंगरूळपीर येथील सांस्कृतिक भवनात कामगार कल्याण विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात कामगार मंत्री अड्. आकाश फुंडकर यांच्याहस्ते असंघटित क्षेत्रातील नोंदणीकृत ४९६ कामगारांना गृहोपयोगी वस्तूंच्या संचांचे वाटप करण्यात आले.यावेळी ते बोलत होते. व्यासपिठावर वाशीम-मंगरूळपीर मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चंद्रकांत ठाकरे, राजू पाटील राजे, सुरेश लुंगे, वाशीम नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, कारंजा नगराध्यक्ष नरेंद्र गोलछा,मंगरुळपीर नगराध्यक्ष वीरेंद्रसींह ठाकूर व माजी नगरसेवक डॉ. दिलीप रत्नपारखी,नगरसेवक अनिल गावंडे, पुरुषोतम चितलांगे, विनोद जाधव,अभिषेक दंडे, रविंद्र ठाकरे,लॉ.वसंत धाडवे,जिनिंग प्रेसींगचे अध्यक्ष सतिश बाहेती,केंद्र संचालक प्रमोद घोडचर सरपंच गोपाल लुंगे,सतीश राठी,नगर सेवक सचीन पवार, मो.शारीक यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

पूढे बोलतांना ॲड. फुंडकर म्हणाले, या कार्यक्रमाच्या निमित्ताने मला एक महत्त्वाचं आवाहन करायचं आहे काही ठिकाणी दलाल, एजंट यांच्यामार्फत पैसे घेऊन लाभ मिळवून देण्याचे प्रकार समोर येत आहेत. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, सरकारच्या कोणत्याही योजनेसाठी कोणालाही एक रुपयाही देण्याची गरज नाही. योजनांचा लाभ पारदर्शक पद्धतीने आणि विनामूल्य मिळतो. कुणी पैसे मागत असेल, तर अशा व्यक्तींविरोधात तात्काळ तक्रार करा. सरकार तुमच्या पाठीशी आहे. या योजनांचा लाभ घेणारे कामगार केवळ लाभार्थी नसून, समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणारे हात आहेत. त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे. आजचा कार्यक्रम हाच संदेश देतो की सरकार तुमच्या पाठीशी आहे, आणि गरजूंना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव सज्ज असल्याचे यावेळी म्हणाले.आमदार श्याम खोडे यांनी देखील बोलतांना सांगितले की, कामगार वर्ग हा आपल्या समाजाचा कणा आहे. त्यांच्या सक्षमीकरणासाठी अशा योजनांची गरज आहे व आपण सर्व स्तरावर कामगारांच्या पाठिशी आहोत. कधीही कोणतीही समस्या असल्यास सांगावी. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून कामकार कल्याणआयुक्त पंकज खांडेकर यांनी कामगार कल्याणकारी मंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. इतर मान्यवरांनी देखील मनोगते व्यक्त केलीत.कार्यक्रमास कामगार विभागाचे अधिकारी कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी,पदाधिकारी ,सामाजिक कार्यकर्ते, तसेच लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हाध्यक्ष सुनिल मालपाणी यांनी केले तर उपस्थितांचे आभार आ.श्याम खोडे यांनी मानले.

## पाण्याअभावी फळबागांवर कुऱ्हाडी चालवण्याची शेतकऱ्यांवर वेळ



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाण्याची कमतरता भासत असल्यामुळे शेतकऱ्यांवर आपले मोसंबीचे बाग तोडण्याची वेळ आली आहे.

बाग तोडताना शेतकऱ्यांचे डोळे पाणावत आहेत, तळ हाताच्या फोडाप्रमाणे शेतकऱ्यांनी ही झाडे ९ वर्षापासून जगवली आहेत. मात्र आज पाणी नसल्यामुळे आणि विकत पाणी घेऊन कर्जत बुडाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

### महायुती राज्याच्या मुळावर उठली माझी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** भाजप राज्याच नुकसान करत आहे हे स्पष्ट आहे. राज्यातून अनेक उद्योग बाहेर जात आहेत. महायुती राज्याच्या मुळावर उठली असून भाजप महाराष्ट्र धर्माच्या विरोधात आहे. अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती अध्यक्ष तथा माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.



यावेळी बोलताना ते म्हणाले की, भाजप आपल्याला संस्कृती आणि भाषापासून तोडत आहेत.राज ठाकरेंची भूमिका म्हणजे इशारा आहे. राज ठाकरे यांचा भाजपने केला भ्रमनिरास केला आहे. बाप आणि पोर पळवणारा आमचा विचार नाही. दोन परिवार एकत्र असतील तर, आम्ही स्वागत करू आम्ही जोडणारे आहोत तोडणारे नाही. महाविकास आघाडीला प्रस्ताव दिला तर विचार करू, त्यांची भूमिका काँग्रेस म्हणून पर्याप्त आहे. हिंदी भाषा सक्तीच्या आम्ही विरहात आहोत. मराठी भाषेची गळचेपी होत आहे.आमच लक्ष याकडे वेधण्याचे आहे. सक्तीच का केलं जात आहे, हे कारस्थान आहे. भाजप सगळ करत आहे, भाजप यामागे द्वेष पसरवत आहे.हिंदी हिंदू आणि हिंदू राष्ट्र असे भाजपला करायचं आहे. संजय राऊत यांची धरसोड वृत्ती आहे.भाजपने अनेकना संपवलं आहे.त्यांनी असा निर्णय घेऊ नये, तुम्ही खूप दिवस झाले पक्षात आहात. भाजपा तुमचा भारमनिरस करेल.असे मत यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

### कसारा-कल्याण मार्गावरील लोकल वाहतूक विस्कळीत

**मुंबई /प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या कसारा ते कल्याण मार्गादरम्यान सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे लोकल वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. यामुळे सदर भागातील लोकल स्थानकांवर सकाळपासून प्रवाशांची मोठी गर्दी झाल्याचं पाहायला मिळत असून ऑफिसला निघालेल्या चाकरमान्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कसारा ते कल्याण यादरम्यानच्या रेल्वे रुळाच्या जवळच पोकलेन वापरून एक काम केले जात होते. मात्र या पोकलेनचा धक्का सिग्नल यंत्रणेच्या वायरला लागला आणि सिग्नल यंत्रणा बंद पडली. त्यामुळे या मार्गावरून मुंबईकडे येणाऱ्या ६ लोकल गाड्या अडकून पडल्या आहेत. त्यामुळे सकाळी कामावर निघालेल्या प्रवाशांवर रेल्वे स्थानकावरच ताटकळत उभे राहण्याची वेळ आली आहे.

# हिंदूंवरील हल्ल्याच्या विरोधात बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेची निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** वक्फ सुधारणा कायद्याचे निमित्त करून पश्चिम बंगालमध्ये हिंदूंवर होत असलेल्या नरसंहार विरोधात ठाण्यात बजरंग दल व विश्व हिंदू परिषद आणि हिंदू संघटनांनी निदर्शने केली. यावेळी आंदोलकांनी जय श्रीराम, भारतमाता की जय अशा घोषणा देत पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी केली.

केंद्र सरकारने वक्फ सुधारणा अधिनियम संसदेत मंजूर केल्यानंतर पश्चिम बंगाल राज्यात हिंदूंवर मोठ्या प्रमाणात अत्याचार, खुनाच्या घटना वारंवार वाढत आहेत. हिंदूंवर होणाऱ्या या नरसंहार आणि अत्याचाराच्या विरोधात सर्वत्र संताप व्यक्त होत असून देशभरात हिंदू संघटनांकडून पश्चिम बंगाल सरकार विरोधात क्रोध व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ठाण्यातही बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, दुर्गा वाहिनी, मातृशक्ती आदी हिंदू संघटनांच्यावतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय विश्रामगृहाच्या समोर निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी घोषणा देत पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लावण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनात बजरंग दल ठाणे संयोजक ॲड. सर्वेश तिवारी, विश्व हिंदू परिषद जिल्हा मंत्री सौरभ पांडे, बजरंग दल संयोजक वेदांत जाधव, दुर्गा वाहिनी प्रांत संयोजिका स्वाती




भोसले, मातृशक्ती घोडबंदर रोडच्या रजनी जैन आदींसह शेकडो हिंदु बांधव व भगिनी उपस्थित होते.

# जलजीवन मिशन योजना सर्वत्रच फेल : शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधीही व्यर्थ खर्च?

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/विशेष प्रतिनिधी : राज्यातील पाणी टंचाई निवारण्यासाठी दरवर्षी हजारो कोटींचा निधी पाण्यासारखा खर्च केला जात असतानाही राज्यातील पाणी समस्या वर्षानुवर्षापासून कायम आहे. विविध योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यासाठी करण्यात येणारी कामे ही केवळ देखावा असल्याचे चित्र समोर आले आहे. त्याचबरोबर दरवर्षी उन्हाळ्यात उपायोजना करण्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करून केवळ राजकीय पदाधिकाऱ्यांचे चलेचपाटे जगविण्याची काम शासन करत आहे की? काय असा प्रश्न निर्माण होत आहे. राज्यात सध्या १६ जिल्ह्यांमध्ये १ हजार ३८४ गावं आणि वाड्यांवर ४७८ टँकरनं पाणीपुरवठा केला जात आहे. यावरून दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च केल्यानंतरही पाणीटंचाई समस्या निवारण होत नसेल तर शासन हा निधी कुठे खर्च करतो आणि यावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या या खेळात मात्र सर्वसामान्य गोरगरिबांची पिण्याच्या पाण्यासाठी मोठी वाताहात निर्माण होत आहे. वास्तव चित्र संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे.**




# महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यात पाणी टंचाईचे चटके

राज्यातील १६ जिल्ह्यांमधील नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात पाण्यासाठी नागरिकांची दररोजची पायपीट सुरू असून महिलांना अंडावर पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. एप्रिल महिन्यातच राज्यातील १ हजार ३८४ गावं आणि वाड्यांवर ४७८ टँकरनं पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाच्या तीव्रता वाढत आहे. त्याप्रमाणेच पाणीटंचाईचाही मोठा प्रश्न निर्माण होत आहे. राज्यातील अनेक विकसित जिल्ह्यात सुद्धा भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे गावागावात टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. सर्वाधिक टँकर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सुरू आहेत. गेल्या आठवड्यात हा आकडा २२३ होता, मात्र, आठवडाभरात हा आकडा अडीचशेपेक्षा जास्त झाला असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. उन्हाचा पारा वाढत असल्याने अनेक छोट्या-मोठ्या तलावांमधील पाणीसाठा झपाट्याने खालावत आहे. तर, ग्रामीण भागांमधील विहिरी आणि बोरवेलचे पाणीदेखील आटले आहे. त्यामुळे अनेक भागात पिण्यासाठी पाणीच नसल्याने टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. मे महिन्यात हे पाणीसंकट आणखी रौद्ररुप धारण करणार असल्याचे चित्र संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. त्यामुळे यावर वेळीच उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## राज्याच्या १६ जिल्ह्यातील टँकरची स्थिती




राज्यात अर्ध्या अधिक जिल्ह्यामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे.नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. अशात शासन नागरिकांना पाणीपुरवठा करण्याची करण्यासाठी पुतनामावशीचे प्रेम दाखवत उपाययोजना करीत आहे. त्यामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून राज्यात सध्या १६ जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये ठाणे जिल्ह्यात ३६ टँकरने पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात येत आहे. तर, रायगड जिल्ह्यात २१ टँकर, पालघर जिल्ह्यात १७ टँकर, नाशिक जिल्ह्यात २२ टँकर, अहिल्यानगर जिल्ह्यात ५६ टँकर, पुणे जिल्ह्यात ३१ टँकर, सातारा जिल्ह्यात ५५ टँकर, सांगली जिल्ह्यात २ टँकर, सोलापूर जिल्ह्यात ५ टँकर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १३५ टँकर, जालना जिल्ह्यात ४६ टँकर, नांदेड जिल्ह्यात २ टँकर, अमरावती जिल्ह्यात १२ टँकर, वाशीम जिल्ह्यात केवळ १टँकर, बुलढाणा जिल्ह्यात २८ टँकर व यवतमाळ जिल्ह्यात ८ टँकरने पाणीपुरवठा करून नागरिकांची तहान भागवली जात आहे.

## तनिषा भिरे मृत्यू प्रकरण ! डॉ. घैसास यांच्यावर गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** दीनानाथ मंगेशकर गर्भवती महिला मृत्यू प्रकरणात मोठी अपडेट हाती आली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर कलम १०६(१) नुसार अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसात गुन्हा नोंदवल्याने घैसास यांच्या अडचणीत भर पडली आहे. दुसरीकडे दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणाचा दुसरा अहवाल समोर आला आहे. ससूनच्या दुसऱ्या अहवालात डॉ. सुश्रुत घैसास दोषी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. ससुन समितीचा दुसरा अहवाल अखेर समोर आला आहे. दुसऱ्या अहवालानंतर डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर काय कारवाई होते, हे पाहावे लागेल.



## पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेस अटक, कोठडी; अटकेच्या कारवाईपूर्वी बडतर्फ

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आरोपी वाल्मीक कराडचा एन्काउंटर करण्याचा कट रचल्याचा थेट मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरच आरोप करणारी चित्रफीत समाजमाध्यमातून प्रसारित करत राज्यभर खळबळ उडवून देणारे बीड येथील सायबर पोलीस ठाण्यातील निलंबित पोलीस उपनिरीक्षक रणजित गंगाधर कासले याला शुक्रवारी पुण्यात अटक करण्यात आली. अटकेनंतर त्यांना दुपारी बीडमध्ये आणण्यात आले. त्याला २१ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.

दरम्यान तत्पूर्वी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी कासले याला गुरुवारी सेवेतून बडतर्फ केले. शुक्रवारी सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस छत्रपती संभाजीनगरमध्ये एका कार्यक्रमानिमित्त होते. त्याच्या पूर्वसंध्येलाच कासलेवरील बडतर्फीचे आदेश काढण्यात आले आले. बडतर्फीची माहिती बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून शुक्रवारी देण्यात आली.



बडतर्फ केल्यासंदर्भातील पत्रात म्हटले आहे, की कासले यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गुजरातमध्ये गेले असता तेथील आरोपीस सोडून दिल्याची एक चित्रफीत प्राप्त झाली. त्याची सत्यता पडताळण्यात आली. कासले यांनी माहिती-तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देऊन पैशांची मागणी केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर २३ मार्च रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली.

त्यानंतरच्या प्राथमिक चौकशीसाठी कासले यांना वेळोवेळी बोलावण्यात आले; परंतु ते आले नाहीत. कासले यांनी निलंबनाविरुद्ध कायदेशीर अपील करणे अपेक्षित असताना, त्यांनी झालेल्या कारवाईस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच महाराष्ट्र सरकारमधील इतर मंत्री, बीड जिल्ह्यातील आमदार, खासदार व पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी यांच्याविषयी चुकीचे, बेताल वक्तव्ये केली. तसेच याची चित्रफीत तयार करून समाजमाध्यमावर प्रसारित केली. तसेच विविध वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून चुकीच्या, तसेच आधारहीन बाबींचा उल्लेख करून मुलाखती दिल्या. निलंबन कालावधीत जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याने विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्याप्रकरणी ॲड. भगवान वसंत कांडेकर यांच्या तक्रारीवरून कासलेंवर बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला होता.

## ठाकरे बंधूनी महाराष्ट्राची दिशाभूल करू नये: ज्योती वाघमारे यांची टिका

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** जर दोन भाऊ एकत्रित येत असतील, तर त्यांच स्वागत केलं पाहिजे. महाराष्ट्राची अस्मिता ही तुम्हाला आत्ताच आठवली. लोकसभेमध्ये तुम्हाला महाराष्ट्र धर्म आठवला नाही का? मुंबई महानगरपालिकेच्या लोण्याच्या गोळ्यावरती डोळा ठेवून ह्यांचं बंधूप्रेम एकत्र आलं आहे.अशी टिका शिवसेना शिंदे गटाचे प्रदेश प्रवक्ता ज्योती वाघमारे यांनी केली. यावेळी रेघोट्या ओढण्यापेक्षा बाळासाहेबांच्या मिठाला कोण जागल हे महत्वाचं आहे.




बाळासाहेब म्हणाले होते. मी शिवसेनाचे काँग्रेस होऊ देणारं नाही, यासाठी एकनाथ शिंदेचं लढले होते, त्यावेळी राजसाहेब कुठे होते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पीठ आणि मीठची भाषा त्यांनी शिकवू नये, जनता खुळी नाही, जनता शिंदे साहेबांसोबत आहेत. राज ठाकरे यांच्याकडे पाहून गोलमाल ३ सिनेमातील जॉनी लिव्हरचा भुला नावाचा कॅरॅक्टर आठवत. भुला म्हटलं की तो पात्र सगळे विसरून जायचा, महाराष्ट्राच्या राजकारणातील भुला पात्र हे राजसाहेबांना म्हणावं लागेल की काय असा प्रश्न आम्हाला उपस्थित झाला आहे. राज ठाकरेंच्या वक्तृत्वाने प्रेम करतो, त्यांच्या नेतृत्वाचा आणि आदर करतो पण सतत भूमिका बदलायचे बरोबर नाही. ठाकरे बंधूनी महाराष्ट्राची दिशाभूल करू नये.अशी टिका शिवसेना शिंदे गटाचे प्रदेश प्रवक्ता ज्योती वाघमारे यांनी केली.



## रस्त्याच्या कडा न भरल्याने अपघाताला निमंत्रण

### विडुळ ते उमरखेड रस्त्यावरील प्रकार

### सुरक्षितता आणि देखभालीची जिम्मेदारी कोणाची?

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** लाखो रुपये खर्च करून तालुक्यातील विडुळ ते उमरखेड हा रस्ता नव्याने डांबरीकरण करण्यात आला. मात्र, कंत्राटदारे रस्त्याच्या कडा न भरल्याने अपघाताला निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे या अपघाताला जबाबदार कोण ? रस्त्यावरील सुरक्षितता आणि देखभाल दुरुस्तीची जिम्मेदारी कोणाची असा प्रश्न या मार्गावरील प्रवासी उपस्थित करीत आहे. बऱ्याच काळात विडुळ ते उमरखेड रोड हा डांबरीकरणाचा रस्ता करण्यात आला. परंतु, साईड पट्टे भरण्यात आले नाही. त्यामुळे डांबरी रस्त्याचे कडे वाहनाला धोका निर्माण करत आहे . ते वाहनाच्या चाकांना गासल्यामुळे टायर फुटून वाहन उलटून अपघाताची शक्यता वाढली आहे. डांबरी रस्त्याच्या बाजुचा कडा किंवा साईड पट्टा नसल्याने रस्त्याच्या वरील डांबराचे आकुंचन, रस्त्याच्या कडेला मातीचे आकुंचन किंवा डांबरात पाणी शिरणे अशा विविध कारणांमुळे रोड खराब होण्याची शक्यता असल्यामुळे पावसाळ्यात हा रोड टिकणार की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. रस्त्याची गुणवत्ता, सुरक्षितता आणि देखभालीसाठी बाजुचे भाडेपट्टे महत्त्वाचे असताना सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग पैसे वाचविण्याच्या नादात रोड ची गुणवत्ता, सुरक्षितता आणि देखभालीची जिम्मेदारी झटकल्याचे दिसत आहे.

> हा रस्ता हॅममध्ये गेल्यामुळे विनाकारण पैसे खर्च करण्याची गरज नाही. तीन वर्षाचा डिफेक्ट लाईफ संपला की,नवीन रस्ता होणार परत करावा, असे एस्टीमेटेमध्ये आहे. साईड पट्टे करायला ठेकेदार तयार आहे. पण आम्हीच आवश्यकता नसल्याने रोड साईड पट्टा भरु दिला नाही.
>
> **-प्रमोद दुधे,**
> **उप कार्यकारी अभियंता,**
> **सार्वजनिक बांधकाम विभाग उमरखेड.**

